**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. एम. जी.गांधी,
ए/२, सिंधी नगर, सासमिरा मार्ग,
वरळी बस डेपोजवळ, मुंबई ४०००३०.

अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-३, यांचे कार्यालय, बावला कपांऊंड,
चिंचपोकळी, मुंबई ४०००२७.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाऊंड,
भायखळा, मुंबई ४००००८.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३०/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |
| **३ उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. एम. जी.गांधी,<br><br>**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त,<br>अनुपस्थित<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>श्री. एस.एस.चतुर- उपस्थित | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

**<u>अपीलकर्ता :</u>** श्री. संजय सुवर्णा यानी श्री. एम.जी.गांधी व इतर यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीची व सिध्दी नगर मधील महिला रहिवाश्यांनी श्री. सुवर्णा यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारी, दिलेले जबाब, श्री. सुवर्णा यांच्या विरुध्द दाखल असलेले गुन्हे याबाबतची माहिती मागितली होती. संबंधित महिलांनी जबाब दिले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. एस.एस. चतुर यानी आधीच्या उत्तरात म्हटले, त्यानंतर मात्र जबाब इन कॅमेरा झाले असल्यामुळे देता येत नसल्याचे म्हटले आहे. ही माहिती मिळणे आवश्यक आहे.

**<u>जन माहिती अधिकारी :</u>** मुद्दा क्र.२ व ३ बाबत (दाखल तक्रारी) फिर्यादीने मागितलेली कागदपत्रे नष्ट करण्यात आली असून अपीलकर्ता श्री. एम.जी. गांधी याना मुद्देनिहाय उत्तर दिले आहे. त्यानी मागितलेली माहिती वरळी व दादर पोलीस ठाण्याच्या संदर्भात असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे पाठवून माहिती मागितली आहे. महिलांच्या जबाबाची माहिती गोपनीय असल्यामुळे ती देता आली नाही.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. एस.एस. चतुर यानी अपीलकर्ता श्री. एम.जी. गांधी याना नेमकी माहिती देणे आवश्यक आहे. संबंधित माहिती गोपनीय असल्यास ती का गोपनीय आहे हे स्पष्ट केले पाहिजे.

## <u>आदेश</u>

१. सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

**सही/-**
**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई.**
**दिनांक:०४/१०/२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र: मुमाआ/नोंदणी क्र.१०६/अपील क्र.६९३०/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०१२

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**
**३) आवक लिपिक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. गिरिधर हिरश्चंद्र पेडणेकर,
अग्नीदूत-अ विंग, सदनिका क्र. २५,
४ था मजला, जे. आर. बोरीचा मार्ग,
सातरस्ता, मुंबई ४०००११. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (अभियांत्रिकी),
महापालिका मुख्यालय, विस्तारित इमारत, तिसरा मजला,
महापालिका मार्ग, मुंबई ४००००१. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख अभियंता,
मुंबई मलनिःसारण प्रकल्प यांचे कार्यालय,
महानगरपालिका इमारत, नेहरु रोड,
विलेपार्ले (पू.), मुंबई ४०००५७.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३१/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गिरिधर हिरश्चंद्र पेडणेकर- उपस्थित.

.

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (अभियांत्रिकी),
श्री. दिनेश गोंडलिया - उपस्थित.

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख अभियंता,
श्री. वि.ज्ञा. बोबाडे - उपस्थित.

| | |
|---|---|
| | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**<u>विवेचन</u>**

**<u>अपीलकर्ता</u> :** महानगरपालिकेचे सेवानिवासस्थान खाली करुन दिले असूनही ग्रॅच्युइटीची रक्कम अडवून ठेवली आहे. ही रक्कम देण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्या कालावधीसाठी रक्कमेवरील व्याजही मिळणे आवश्यक आहे.

**<u>जन माहिती अधिकारी</u> :** सेवानिवासस्थान खाली केल्याचे अपीलकर्ता श्री. गिरीधर पेडणेकर यानी उशिरा कळविले. त्यांच्या मागणीनुसार संबंधित संचिकेतील सर्व कागदपत्रांच्या प्रती त्याना दिलेल्या आहेत. तसेच त्यानी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही दिली आहेत.

अपीलकर्ता श्री. गिरीधर पेडणकर यानी केलेली मागणी प्रशासकीय कार्यवाहीबाबतची असून ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता श्री.वि.ज्ञा.बोबडे यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येते.

**सही/-**

**(विजय कुवळेकर)**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई.**

**दिनांक:०४/१०/२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रः मुमाआ/नोंदणी क्र.१०७/अपील क्र.६९३१/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. हरिष चंदू बडेकर,
३०७/७, तेजोमय को.ऑ.हौ.सो., सेक्टर क्र.३,
चारकोप, कांदिवली (प.), मुंबई ४०००६७. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथाउपसचिव
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३२/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. हरीष चंदू बडेकर - अनुपस्थित.

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव, श्री. उ. शि. लोणारे - उपस्थित.

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव, श्रीमती उर्मिला कृ. धादवड - उपस्थित.

| | |
|---|---|
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मागसवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीबाबत मंजूर निधी व विनियोगाची जिल्हावार माहिती, गुणांची अट, शिष्यवृत्ती रक्कमेत वाढ न करणे इत्यादीच्या प्रशासकीय कारणांची विचारणा अपीलकर्ता श्री. हरिष चंदू बडेकर यानी दिनांक ०७.०७.२०१० च्या अर्जान्वये केली होती. त्यांचा अर्ज दिनांक २९.०७.२०१० रोजी प्राप्त झाला. सन २००३ पासूनच्या छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेची माहिती त्यानी मागितली होती. ही जिल्हा स्तरावरील माहिती असून त्याचा तपशील विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालयांकडे उपलब्ध असल्यामुळे सदर अर्ज राज्यातील त्या सर्व कार्यालयांकडे वर्ग केला व विहित मुदतीत उपलब्ध असलेली माहिती देऊन पुढील कार्यवाही केली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा श्रीमती उर्मिला कृ. धादवड यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्ता श्री. हरिष चंदू बडेकर यानी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये ती नाकारता येते. प्रशासकीय कारणांचा खुलासा, स्पष्टीकरण अशा प्रकारची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. तसेच सर्व जिल्ह्यातील संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज वर्ग करणे जन माहिती अधिकाऱ्यावर बंधनकारक नाही. जन माहिती अधिकारी तथा श्रीमती उर्मिला कृ. धादवड व अपिलीय प्राधिकारी तथा श्री. उ.शि.लोणारे यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांक:०४/१०/२०११.** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रः मुमाआ/नोंदणी क्र.१११/अपील क्र.६९३२/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

1. **निवडनस्ती**
2. **स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. विनायक विठ्ठल कांबळे द्वारा : श्री. आर. एन. मुंगे,
ईला ब्रिज, रामदेव मास्तरची चाळ, हनुमान नगर,
ओएनजीसी कॉलनीच्या मागे, ट्रॅन्झिस्ट कॅम्प बिल्डिंग, तिसरा मजला,
रुम क्र. ३१४, एस. व्ही. रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
नगर विकास विभाग, नवि-१०, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग, नवि-१०, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३३/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |
| **३** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. विनायक विठ्ठल कांबळे - उपस्थित.<br><br>**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,<br>श्री. सुरेश काकणी- अनुपस्थित.<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,<br>श्री. राजेश गोविल - उपस्थित. | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

**अपीलकर्ता :** सन २००७ ते २०१० या काळात सिडकोमध्ये अनुसूचित जातीचा अनुशेष शिल्लक असताना त्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने भरती केल्याबाबतच्या श्री. माणिकराव ठाकरे, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांच्याकडे केलेल्या तक्रारीवर नगर विकास विभागाने सिडकोकडून अहवाल मागितला होता, तो मिळाला नाही.

**जन माहिती अधिकारी :** अपीलकर्ता श्री. विनायक विठ्ठल कांबळे यानी दिनांक १६.१०.२०१० च्या अर्जानुसार सिडकोकडील भरतीबाबतची माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री. राजेश गोविल यानी या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकर्त्यास दिनांक २७.१०.२०१० च्या पत्रान्वये शुल्क कळविले व शुल्क प्राप्त झाल्यानंतर दिनांक १५.११.२०१० रोजी माहिती दिली. उपलब्ध माहिती अपीलकर्ता श्री. विनायक विठ्ठल कांबळे यास देण्यात आली असून अहवालाबाबतची कार्यवाही सिडकोकडून अद्याप झालेली नसल्यामुळे ती देता आली नाही. अपीलकर्ता श्री. विनायक विठ्ठल कांबळे यास आवश्यक असल्यास अभिलेखाची पहाणी करता येईल, असे प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव श्री. सुरेश काकाणी यानी आदेशात स्पष्ट कले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री. विनायक विठ्ठल कांबळे यांच्या तक्रारीवर नगरविकास विभागाने सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिनांक १८.१०.२०१० च्या पत्रान्वये कळविल्यानुसार सिडकोने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सिडकोकडून १० दिवसांत मागवून घ्यावा व अपीलकर्ता श्री. विनायक विठ्ठल कांबळे याना माहिती पाठवून आयोगाला तसा अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार आयोगापुढे अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे.

**आदेश**

२. सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

३. आयोगाच्या मौखिक आदेशनुसार जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री. राजेश गोविल यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक ३०.०१.२०१२ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**सही/-**

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांकः०४/१०/२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रः मुमाआ/नोंदणी क्र.११२/अपील क्र.६९३३/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० जानेवारी, २०१२

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**
**३) आवक लिपिक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. अंकुर प्रभाकर पाटील,
६०१, ओम सिध्दीविनायक को.ऑप.हौ.सो.लि,
बबनराव कुलकर्णी मार्ग, मुलुंड (पू.), मुंबई- ४०००८१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
टी विभाग, रुम नं. २४, पहिला मजला, टी विभाग म्युन्सिपल ऑफिस,
लाला देवीदयाळ मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई- ४०००८०. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. अभियंता (परिरक्षण),
सहा. आयुक्त टी विभाग यांचे कार्यालय, लाला देवीदयाळ मार्ग,
मुलुंड (पश्चिम), मुंबई- ४०००८०.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३४/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अंकुर प्रभाकर पाटील- उपस्थित.

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
श्री. एस.आर. सिंग- उपस्थित.

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. अभियंता (परिरक्षण),
श्री.सतीश यशवंत थत्ते - उपस्थित.

| | |
|---|---|
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

**<u>अपीलकर्ता</u> :** मुलुंड (पू.) येथील रेल्वे स्थानकाबाहेरील पोलीस चौकी बांधकामाबाबत माहिती मागितली होती. परंतु नेमकी माहिती न देता असंबंधित माहिती दिली आहे. महानगरपालिकेच्या निधीतून चौकीचे बांधकाम केले होते का, हे स्पष्ट केले नाही.

**<u>जन माहिती अधिकारी</u> :** अपीलकर्ता श्री. अंकुर प्रभाकर पाटील याच्या दिनांक १३.०७.२०१० च्या अर्जाला दिनांक २६.०७.२०१० रोजी पत्रान्वये उत्तर दिले व अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्राप्त करुन घ्याव्यात, असेही कळविले. तसेच अभिलेखातील माहिती दिली. पोलीस चौकी अनधिकृत प्रकारात मोडते का? सर्व नियमांची पूर्तता झाली आहे का? अशा स्वरुपाचे प्रश्न त्यानी विचारले असून, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अशी विचारणा 'माहिती' ठरत नाही, असेही अपीलकर्ता श्री. अंकुर प्रभाकर पाटील याना कळविले होते. त्याना आणखी कागदपत्रे हवी असल्यास योग्य ते शुल्क आकारुन ती उपलब्ध करुन देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. एम.आर.सिंग यानी दिले. त्यानुसार उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची प्रत व माहिती देण्यात आली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी श्री. सतीश यशवंत थत्ते व अपिलीय प्राधिकारी श्री. एस.आर. सिंग यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्ता श्री. अंकुर प्रभाकर पाटील याना हवे असल्यास जन माहिती अधिकारी यानी उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन पुन्हा एकदा आठ दिवसांत पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने दिले.

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(विजय कुवळेकर)**
**दिनांक:०४/१०/२०११.** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र: मुमाआ/नोंदणी क्र.११५/अपील क्र.६९३४/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. दिनेश जयवंत राऊळ, अपीलकर्ता
बी.डी.डी. चाळ क्र. १०/५३, दुसरा मजला,
शिवडी, मुंबई ४०००१५.

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ- ३, यांचे कार्यालय, बावला कंपाऊंड,
चिंचपोकळी, मुंबई- ४०००२७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग, बावला कंपाऊंड,
भायखळा, मुंबई- ४००००८

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३५/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |
| **३** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. दिनेश जयवंत राऊळ- उपस्थित.<br><br>**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त,<br>श्री. सुहास वारके- अनुपस्थित.<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>श्री. एस.एस. चतूर - उपस्थित. | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

**<u>अपीलकर्ता</u> :** मी एक सामाजिक कार्यकर्ता व मुक्त पत्रकार असून ज्येष्ठ नागरिक आहे. एका मुलीचे लग्न झाल्यानंतर तिचे चारित्र्यहनन करणारे पत्र कोणीतरी त्या मुलीच्या सासरी पाठविले. मुलीच्या आईने पत्राची पूर्ण शहानिशा न करता माझ्या विरुध्द पोलिसांकडे तक्रार नोंदविली. पोलिसांनी मला पोलीस ठाण्यात नेले, एका शिपायाने तेथे माझ्या कानफटात मारली, अरेरावीचे वर्तन केले. असे मारल्यामुळे माझा कान निकामी होऊन नोकरी गेली, खोटया आरोपामुळे माझी बदनामी झाली. पोलीस डायरीत संबंधित व्यक्तीविरुध्द तक्रार नोंदविली आहे की नाही ते स्पष्ट होत नाही.

**<u>जन माहिती अधिकारी</u> :** अपीलकर्ता श्री. दिनेश जयवंत राऊळ याना माहिती दिली आहे. तसेच त्यांच्याशी गैरवर्तन करणाऱ्या पोलिसाला सक्त ताकीद देण्याची शिक्षा करण्यात आली आहे. अपीलकर्ता श्री. दिनेश जयवंत राऊळ यानी केलेली तक्रार व मागणी केलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. तथापि एका मुलीचे चारित्र्यहनन करणारे पत्र पाठविण्याच्या प्रकरणी अपीलकर्ता श्री. दिनेश जयवंत राऊळ याना पोलिसांनी बोलावले, जबाब घेतला, हे लक्षात घेता संबंधित पत्राची प्रत श्री. राऊळ याना पुरविली जाणे आवश्यक होते. मूळ तक्रारीची चौकशी झाली का? त्यात या पत्राबाबतच्या चौकशीचा निष्कर्ष काय आहे? याचे समाधानकारक उत्तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. एस.एस. चतूर देऊ शकले नाहीत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता श्री. दिनेश जयवंत राऊळ यांच्या विरुध्द पोलिसांकडे नोंदविलेल्या तक्रारी संदर्भात वर उल्लेख केलेल्या पत्राबाबतच्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी श्री. एस. एस. चतूर यानी अपीलकर्ता श्री. दिनेश जयवंत राऊळ याना कळवावे. तसेच संबंधित पत्राची प्रत अपीलकर्ता श्री. दिनेश जयवंत राऊळ याना

पुरवावी. यानुसार कार्यवाही करुन, हे आदेश प्राप्त झाल्यापासून दहा दिवसांत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**मुंबई** **(विजय कुवळेकर)**
**दिनांक:०४/१०/२०११.** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रः मुमाआ/नोंदणी क्र.१०८/अपील क्र.६९३५/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. अे.आर.चांदोरीकर,
द्वाराः उद्योग संचालनालय, २ रा मजला,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मुंबई ४०००३२. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव ( उद्योग-३),
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव ( उद्योग-३),
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३६/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अे.आर.चांदोरीकर - उपस्थित

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव ( उद्योग-३),
श्री. कांचन विजयन - उपस्थित

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव ( उद्योग-३),
श्री. अंजली भावे- उपस्थित

| | |
|---|---|
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

**अपीलकर्ता :** अधिक्षकीय उद्योग अधिकारी वर्ग-१ (गट-अ) यांच्यासाठीच्या बिंदूनामावलीची सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेची प्रत व त्या अनुषंगाने रिक्तपदे आदिबाबत माहिती दोन अर्जाद्वारे मागितली होती. बिंदूनामावलीप्रमाणे पदोन्नती न दिल्यामुळे बिंदूनामावलीची सांक्षांकित प्रत मिळावी.

**जन माहिती अधिकारी :** अपीलकर्ता श्री. अे.आर.चांदोरीकर यांच्या दिनांक १८.०८.२०१० च्या अर्जाला दिनांक २६.०८.२०१० च्या पत्रान्वये व दिनांक ०६.०९.२०१० च्या अर्जाला दिनांक ०६.१०.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. माहिती संकलित स्वरुपात तयार करुन देण्याची मागणी होती, तसे करता येत नसल्याचे त्याना कळविले. सामान्य प्रशासन विभागाकडून बिंदूनामावलीला मान्यता घेणे शासन निर्णयानुसार बंधनकारक असून अशी मान्यता प्राप्त झाल्याशिवाय प्रत देता येणार नाही. मात्र अधिक्षकीय उद्योग अधिकारी वर्ग-१ (गट-अ) संवर्गाची संचालनालय स्तरावर उपलब्ध असलेली व प्रमाणित करण्यासाठी शासनाकडे पाठविलेल्या बिंदूनामावलीची प्रत तसेच विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीची माहिती अपीलकर्ता श्री. अे.आर.चांदोरीकर याना दिली.

**प्रथम अपिलीय अधिकारी :** अपीलकर्ता श्री. अे.आर.चांदोरीकर यानी दोन प्रथम अपिले केली होती. त्या दोन्हीवर मिळून आयोगाकडे मात्र एकच अपील केले. सामान्य प्रशासन विभागाकडून बिंदूनामावलीला मंजूरी आल्यानंतर अपीलकर्ता श्री. अे.आर.चांदोरीकर याना त्याची प्रत देण्यात येईल. कोणतीही माहिती नाकारली नाही. एका अधिकाऱ्याच्या विभागीय चौकशीची माहिती अपीलकर्ता श्री. अे.आर.चांदोरीकर यानी मागितली होती. परंतु चौकशीची कार्यवाही सुरु असल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे त्यानी स्पष्ट केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (उद्योग-३), श्रीमती अंजली भावे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (उद्योग-३), श्रीमती कांचन विजयन यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र सध्या किती पदे भरलेली आहेत, बिंदूनामावलीतील बिंदू कधीपासून रिक्त आहे. या संदर्भात उपलब्ध असलेले अभिलेख अपीलकर्ता श्री. अे.आर.चांदोरीकर याना अवलोकनार्थ द्यावे व त्यातील ज्या कागदपत्रांच्या प्रती त्याना हव्या असतील त्या पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

**<u>आदेश</u>**

१. सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

**मुंबई.**
**दिनांक:०४/१०/२०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. मुकेश विरजी छेडा,
विरसेन विले, प्लॉट नं १७, ५ वा मजला,
रानडे रोड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०००२८.

अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ वार्ड,
जी/नॉथ ऑफिस बिल्डिंग, १ ला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग,
दादर (प.), मुंबई ४०००२८.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक अभियंता (नगर रचना १),
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ वार्ड,
जी/नॉथ ऑफिस बिल्डिंग, १ ला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग,
दादर (प.), मुंबई ४०००२८.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३७/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मुकेश विरजी छेडा - उपस्थित

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
अनुपस्थित

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक अभियंता (नगर रचना १),
श्री. सी.आर अल्ले - उपस्थित

| | |
|---|---|
| | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवचन**

**अपीलकर्ता :** माहिममध्ये खुल्या जागेत टाकलेल्या पत्र्यांबाबत केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती व त्याबाबतचा अहवाल मागितला होता. परंतु परिरक्षण विभागाने नेमकी माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (नगर रचना) (अंमलबजावणी) यानी आपल्या विभागाकडून अशी कोणतीही कार्यवाही कारण्यात आली नसल्याचे कळविले. ही माहिती परिरक्षण विभागाने द्यावयाची आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (नगर रचना) यानी अपीलकर्ता श्री. मुकेश विरजी छेडा याच्या दिनांक ३१.०८.२०१० च्या अर्जाला दिनांक २९.१०.२०१० च्या पत्रान्वये म्हणजेच महितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींच्या ३० दिवसांच्या विहित मुदतीपेक्षा विलंबाने उत्तर दिले आहे. तसेच संबंधित माहिती परिरक्षण विभागाकडील असल्यास त्यानी महितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ मधील तरतुदीनुसार ५ दिवसांत अर्ज परिरक्षण विभागाकडे हस्तांतर करणे आवश्यक आहे असे कळविले नाही. नगर रचना विभागाने संबंधित माहिती प्राप्त करुन घेऊन अथवा परिरक्षण विभागाला कळवून एक आठवड्यात अपीलकर्ता श्री. मुकेश विरजी छेडा याना माहिती द्यावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

त्यानुसार जन माहिती अधिकारी श्री. सी. आर. अल्ले यानी परिरक्षण विभागाच्या जन माहिती अधिकारी याना दिनांक ०५.१०.२०११ च्या पत्रान्वये कळविल्याचे आयोगास अवगत केले. मात्र परिरक्षण विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. तसेच अपीलकर्ता श्री. मुकेश विरजी छेडा यानी याबाबत आयोगास काहीही कळविले नाही.

**आदेश**

१. सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता श्री. मुकेश विरजी छेडा यांच्या दिनांक ३१.०८.२०१० च्या अर्जाला जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (नगर रचना) यानी दिनांक २९.१०.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींच्या ३० दिवसांच्या विहित मुदतीपेक्षा २८ दिवस विलंबाने उत्तर दिले असून विलंबाची कारणे व शास्तीबाबतचे म्हणणे खुलाशासह जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (नगर रचना) यानी हे आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत आयोगाला सादर करावे.

३. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण विभाग) यानी अपीलकर्ता श्री. मुकेश विरजी छेडा याना माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.

**मुंबई.**
**दिनांक:०४/१०/२०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. विश्वनाथ एस.चौधरी,
ए-१/१०, अशोका फ्लॅट नं. ६०२,
यशोधाम, फिल्मसिटी रोड,
गोरेगाव (पू.), मुंबई ४०००६३. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीसउपआयुक्त,
परिमंडळ-१२, शैलेंद्र नगर,
दहिसर (पू.), मुंबई ४०००६८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पू.), मुंबई ४००१०१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३८/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. विश्वनाथ एस.चौधरी - उपस्थित

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त,
अनुपस्थित.

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, (विद्यमान)
श्री. व्ही.बी.पाटील - उपस्थित.

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, (तत्कालीन)

| | |
|---|---|
| श्री. जयप्रकाश जाधव- उपस्थित. | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

**अपीलकर्ता :** श्रीकृष्ण वाटिका मंदिर येथे ध्वनीक्षेपकाच्या वापरासंदर्भात मागितलेली माहिती अद्याप समाधानकारक अशी मिळाली नाही. श्रीकृष्ण वाटिका मंदिर व संबधित दोन शाळा या "शांतता क्षेत्र घोषित" असून दिंडोशी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी नियमभंग करुन ध्वनीक्षेपकाच्या वापराला परवानगी दिली असल्यामुळे माहिती दिली नाही.

**जन माहिती अधिकारी :** अपीलकर्ता श्री. विश्वनाथ चौधरी यानी दिनांक १३.०७.२०१० च्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती सहायक पोलिस आयुक्त, दिंडोशी विभाग यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्ता श्री. विश्वनाथ चौधरी याना दिली. तत्कालीन पोलिस उपायुक्त परिमंडळ १२ यानी अपीलकर्ता श्री. विश्वनाथ चौधरी याच्या मूळ तक्रार अर्जावर दिलेल्या सूचनांच्या पूर्ततेच्या कार्यवाहीसाठी अवधी लागल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. जयप्रकाश जाधव यानी माहिती देण्याबाबत तत्परतेने कार्यवाही केली आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ मधील तरतुदीनुसार माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असल्यास पाच दिवसांत अर्जाचे हस्तांतर करणे व अपीलकर्त्यास तसे कळविणे आवश्यक आहे. माहिती त्याच खात्यातील विभागाशी / अधिकाऱ्याशी संबंधित असेल तेव्हा अन्य पोलिस ठाण्याकडून / अधिकाऱ्याकडून माहिती घेण्याचे अपीलकर्त्यास न कळविता जन माहिती अधिकारी यानी अर्ज हस्तांतर करण्याची कार्यवाही केली पाहिजे.

अपीलकर्ता श्री. विश्वनाथ चौधरी यांच्या मूळ तक्रारी संदर्भात सादर केलेल्या अहवालाची प्रत उपलब्ध असल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यानी नमूद केले असून ती अपीलकर्ता श्री. विश्वनाथ चौधरी यास पुरविण्यात यावीत असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

**आदेश**

१. सदर अपील निकाली काढण्यात येते.

**मुंबई.**
**दिनांकः०४/१०/२०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

ॲड. सचिन गजानन आडकर,
अे-२/३५, प्रतिक्षा नगर, सायन,
मुंबई ४०००२२. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य अभियंता,
ग्राहक सेवा (दक्षिण), २ रा मजला, इलेक्ट्रिक हाऊस,
शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय अभियंता( दक्षिण),
ग्राहक सेवा 'ब' विभाग, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,
कुलाबा, मुंबई ४००००१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९३९/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सचिन गजानन आडकर - उपस्थित

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य अभियंता,
श्री. डी.एस. खलप - उपस्थित

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय अभियंता( दक्षिण),
श्री. एस.एन.भिंगे - उपस्थित

| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

**अपीलकर्ता :** सन २००३ मधील निधन पावलेल्या व्यक्तींचे नाहरकत प्रमाणपत्र सन २००५ मध्ये सादर करुन अशा बनावट कागदपत्रांच्या आधारे वीजमीटर हस्तांतरीत करण्यात आल्याबाबत माहिती मागितली होती. संबंधित कागदपत्रांची तपासणी करुन हस्तांतरास मान्यता देणारी सही ज्या अधिकाऱ्याने केली आहे, त्यांचे नाव, हुद्दा, सध्या कार्यरत असल्याचे ठिकाण हा तपशील मागितला होता. परंतु गैरव्यवहार उजेडात येऊ नये म्हणून संबंधित अधिकाऱ्याचे नाव देता येत नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता (दक्षिण), श्री. एस.एन.भिंगे यानी दिले आहे.

**जन माहिती अधिकारी :** सन २००५ मधील प्रकरण असल्यामुळे त्यावेळी उपलब्ध असलेल्या कागपत्रांच्या प्रती अपीलकर्ता श्री. सचिन गजानन आडकर याना दिल्या आहेत. बनावट कादपत्रांची प्रत त्यानी सादर केल्यास त्याबाबत चौकशी करणे सोयीस्कर होईल. वीज मीटर हस्तांतर करणाऱ्या पर्यवेक्षकाच्या सही वरुन त्यांचे नाव आदि तपशील ठामपणे सांगता येत नाही असे कळविले आहे.

बनावट कागदपत्रांच्या आधारे वीज मीटरचे हस्तांतरण/ बिलावरील नावात बदल केल्याचे संदर्भात अपीलकर्ता श्री. सचिन गजानन आडकर यानी नोंदविलेला आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियमांतर्गत निर्णयाचा विषय नाही. मात्र संबंधित प्रकरण जुलै २००५ मधील असून ती माहिती फार जुनी म्हणता येणार नाही. तसेच संबंधित प्रकरणी मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीवरुन अधिकाऱ्याचे नाव सांगता येणार नाही हे उत्तर योग्य नाही. तत्कालीन पर्यवेक्षकाच्या अन्य कागदपत्रांच्या आधारे अथवा त्याना विचारणा करुन नाव अपीलकर्ता यास पुरविणे शक्य व आवश्यक आहे. तसेच वीज मीटर हस्तांतर विषयक कायदेशीर माहिती

अपीलकर्ता श्री. सचिन गजानन आडकर याना दहा दिवसांत पुरवावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

**<u>आदेश</u>**

१. सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

२. आयोगाच्या मौखिक आदेशनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता (दक्षिण), श्री. एस.एन.भिंगे यानी हे आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत आयोगाला सादर करुन त्याची प्रत अपीलकर्ता श्री. सचिन गजानन आडकर याना पुरवावी.

**मुंबई.**
**दिनांक:०४/१०/२०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. अजय मधुसुदन मराठे,
५०४, न्यु सर्वोदया को.हौ.सो,
सेक्टर-४,प्लॉट २९ ब, वाशी,
नवी मुंबई ४००७०३. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपमहानिरीक्षक,**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा**
उपसहायक पोलीस महानिरीक्षक (लेखा-२)
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९४१/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३ उपस्थित**
**अपिलार्थी** श्री. अजय मधुसुदन मराठे - अनुपस्थित.

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उपमहानिरीक्षक,
श्री. दत्ता स.ढवळे- उपस्थित.

**जन माहिती अधिकारी** तथा उपसहायक पोलीस महानिरीक्षक (लेखा-२)
श्री. अ.शि.चौगुले- उपस्थित.

| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

बुलेट प्रुफ जॅकेट संदर्भात पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व पोलीस महासंचालक, मुंबई, गृह विभाग, महाराष्ट्र शासन या सर्वांकडील माहिती संकलित करुन मिळालेली नाही. काही अधिकाऱ्यांनी वेगवेगळी माहिती नागरिकांना दिल्याचे दिसून येते. म्हणून या संदर्भात योग्य व संपूर्ण माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. अजय मधुसुदन मराठे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे. बुलेट प्रुफ जॅकेट शासनाकडून खरेदी केली जातात, जॅकेटचा उपयोग व अन्य तपशील याबाबतची माहिती जॅकेट निकामी झाल्यानंतर देण्यात येईल, असे विषयाची संवेदनशीलता लक्षात घेऊन अपीलकर्ता श्री. अजय मधुसूदन मराठे याना कळविले होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपसहायक पोलीस महानिरीक्षक (लेखा-२) श्री. अ.शि. चौगुले यानी केले.

बुलेट प्रुफ जॅकेट संदर्भात खरेदीबाबतची संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व पोलीस महासंचालक यांच्याकडून झालेली आहे. त्यासाठी लागणारे बुलेट प्रुफ जॅकेट त्यानी स्वतंत्रपणे खरेदी केलेले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी गृह विभाग, महाराष्ट्र शासन यानी अपीलकर्ता श्री. अजय मधुसूदन मराठे याना दिनांक २०.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा उपसहायक पोलीस महानिरीक्षक (लेखा-२) श्री. अ.शि. चौगुले यानी केलेले निवेदन व हे उत्तर यामध्ये तफावत आहे. याबाबतची नेमकी वस्तुस्थिती नागरिकांना कळणे आवश्यक आहे. याबाबत सचिव, गृह विभाग यानी खुलासा करणे आवश्यक आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येते.

२. बुलेट प्रुफ जॅकेटच्या खरेदीबाबतची नेमकी वस्तुस्थिती सचिव, गृह विभाग, महराष्ट्र राज्य यानी अपीलकर्ता श्री. अजय मधुसूदन मराठे याना पुरवून दिनांक २५.१२.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**मुंबई** **(विजय कुवळेकर)**
**दिनांक:०४/१०/२०११.** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र: मुमाआ/नोंदणी क्र.११६/अपील क्र.६९४१/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. भगवानजी आर.रैयानी,
कुबेर भुवन, बजाज रोड,
विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ४०००५६.

अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा
आय/सी, रजिस्ट्रार (इन्स्पेक्शन-१),
उच्च न्यायालय, मुंबई ४०००३२.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
मास्टर ॲण्ड सहायक प्रोथोनोटरी (आस्था),
उच्च न्यायालय, मुंबई ४०००३२.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९४२/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. भगवानजी आर.रैयानी - उपस्थित.

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** आय/सी, रजिस्ट्रार (इन्स्पेक्शन-१),
श्री. राजेश जे. कारंडे (प्रतिनिधी)- उपस्थित.

**जन माहिती अधिकारी** तथा मास्टर ॲण्ड सहायक प्रोथोनोटरी (आस्था),
श्री. राजेश जे. कारंडे (प्रतिनिधी)- उपस्थित.

| | |
|---|---|
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

**अपीलकर्ता :** मी अनेक जनहितार्थ याचिका केल्या असून त्यांच्या सुनावणीच्या वेळी काही न्यायाधीश साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून युक्तीवाद करावयास लावतात, काही न्यायाधीश तसे करत नाहीत. स्वतःचा खटला स्वतः चालविणाऱ्या व्यक्तीला अशा प्रकारे पिंजऱ्यात उभे राहून युक्तीवाद करणे आवश्यक असल्यास नियमांच्या प्रतींची मागणी मी केली होती. परंतु तशी नेमकी माहिती दिलेली नाही. उच्च न्यायालयाचे कामकाज कोणत्या नियमाद्वारे चालविले जाते, असे सर्वसाधारण उत्तर जन माहिती अधिकारी तथा मास्टर ॲण्ड सहायक प्रोथेनोटरी (आस्था) श्री. एस.एस. कंथाळे यानी दिले.

**जन माहिती अधिकारी (प्रतिनीधी) :** काही न्यायाधीश साक्षीदारास पिंजऱ्यात उभे राहून युक्तीवाद करावयास लावतात व काही तसे करत नाहीत, हे मान्य आहे. परंतु त्याबाबत निश्चित असे काही नियम नसून संबधित न्यायाधीशांवर ते अवलंबून आहे. तसे अपीलकर्ता श्री. भगवानजी आर. रैयानी याना कळविले असून प्रथम अपिलीय अधिकारी यानी हे उत्तर ग्राह्य धरुन अपील फेटाळले आहे.

अपीलकर्ता श्री. भगवानजी आर. रैयानी यानी दिनांक ०४.०८.२०१० रोजी केलेल्या व दिनांक २३.०८.२०१० रोजी दाखल करुन घेतलेल्या अर्जाला जन माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक ०४.१०.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ३० दिवसांत उत्तर देणे आवश्यक असून विलंबाचे स्पष्टीकरण त्यानी दिलेले नाही. स्वतः दाखल केलेल्या दाव्याबाबत युक्तीवाद करताना साक्षीदाराच्या पिंजऱ्यात संबधित पक्षकाराला बोलवावे की नाही याबाबत नेमके नियम नसल्याचे अपीलकर्ता श्री. भगवानजी आर. रैयानी याना स्पष्ट लेखी उत्तर दिले जाणे आवश्यक आहे, तसे ते द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

## आदेश

१. सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

२. स्वतः दाखल केलेल्या दाव्याबाबत युक्तीवाद करताना साक्षीदाराच्या पिंजऱ्यात संबधित पक्षकाराला बोलवावे की नाही, याबाबत विशिष्ट असे नियम नसल्यास तसे स्पष्ट उत्तर देऊन अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी तथा मास्टर ॲण्ड सहायक प्रोथेनोटरी (आस्था) श्री. एस.एस. कंथाळे यानी दिनांक ३०.०१.२०१२ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. अपीलकर्ता श्री. भगवानजी आर. रैयानी यास अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत उत्तर न दिल्याबाबतच्या विलंबाची कारणे व शास्तीबाबतचे म्हणणे खुलाशासह जन माहिती अधिकारी तथा मास्टर ॲण्ड सहायक प्रोथेनोटरी (आस्था) श्री. एस.एस. कंथाळे यानी दिनांक ३०.०१.२०१२ पर्यंत आयोगास सादर करावे.

**सही/-**
**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई.**
**दिनांक:०४/१०/२०११**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रः मुमाआ/नोंदणी क्र.१२१/अपील क्र.६९४२/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० जानेवारी, २०१२

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**
**३) आवक लिपिक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. राजेश हिरालाल मर्चंट,
७१/४ गांधीनगर, दैनिक शिवनेर मार्ग,
मार्बल मार्ट शेजारी, वरळी, मुंबई ४०००१७.

अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण निरीक्षक,
बृहन्मुंबई दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
गिल्डरलेन म्युनि. स्कुल इमारत, ३ रा मजला,
मुंबई सेंट्रल (पू.), मुंबई ४००००८.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधिक्षक,
बृहन्मुंबई दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
गिल्डरलेन म्युनि. स्कुल इमारत, ३ रा मजला,
मुंबई सेंट्रल (पू.), मुंबई ४००००८.

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
एम.एस.पी.टी.हायस्कूल,
ग्रॅन्ट रोड, मुंबई ४००००७.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९४३/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०४.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. राजेश हिरालाल मर्चंट,

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण निरीक्षक,

| | |
|---|---|
| श्री. बी.डी.पुरी- उपस्थित<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अधिक्षक,<br>श्री. एम.पी.शोभणे- उपस्थित<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,<br>श्री. पिटर डिकोस्टा - उपस्थित | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

**अपीलकर्ता :** सन १९५५ ते १९६० या दरम्यान माझे काका अंदाजे सातवी ते दहावी या वर्गात मास्टर शितलदास पुनवानी ट्युटोरिअल हायस्कूल मध्ये होते. जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी मला त्यांचा शाळा सोडल्याचा दाखला हवा असून तो शिक्षण निरिक्षक कार्यालयाकडे मागितला होता. त्यानी तो शाळेकडून घेण्याचे सांगितले. प्रथम अपिलीय अधिकारी यानी आदेश देऊनही शाळेने प्रमाणपत्र दिले नाही.

**जन माहिती अधिकारी :** विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला व त्या विषयीचे प्रमाणपत्र हा शाळेच्या अभिलेखातील भाग असल्यामुळे अपिलकर्त्यास तसे कळविलेले होते. शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्या संदर्भातील आवश्यक कागदपत्रांची मागणी केली असता त्यानी ती दिली नाही. तसेच शाळा सोडल्याचा दाखला फक्त संबंधित विद्यार्थ्याच्या पालकांना देता येतो. त्रयस्थ पक्षास याबाबतची माहिती देता अथवा दाखविता येत नाही.

अपीलकर्ता श्री. राजेश हिरालाल मर्चंट यानी मागणी केलेला शाळा सोडल्याचा दाखला देणे हे अधिनियमांतर्गत येत नाही. त्रयस्थ पक्षाचे अधिकार पत्र दाखल केल्यास संबंधित रजिस्टर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. पिटर डिकोस्टा यानी त्याना अवलोकनासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

## आदेश

१. सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांक:०४/१०/२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र: मुमाआ/नोंदणी क्र.१०७/अपील क्र.६९३१/०२
१३ मजला नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०११

**मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

**सचिव**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**

**प्रत,**

**१) निवडनस्ती**
**२) स्वीय सहाय्यक**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. मनोज कुमार यादव,
तपस्या टाईम्स, १ साकिनाका इंडस्ट्रियल इस्टेट,
हॉलिडे इन हॉटेल जवळ, ए.जी. लिंक रोड,
साकिनाका, मुंबई ४०००७२. अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,
'एल' विभाग कार्यालय, कुर्ला (प.), मुंबई ४०००७०. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** (इ व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,
'एल' विभाग कार्यालय, कुर्ला (प.), मुंबई ४०००७०.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८४५/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०५.१०.२०११ |
| **३** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. मनोज कुमार यादव - उपस्थित<br><br>**प्रथम अपिलीय प्राधिकारी** -अनुपस्थित<br><br>**जन माहिती अधिकारी** (इ व का.),<br>श्री. प्र.कृ.कांबळे -उपस्थित. | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

**अपीलकर्ता:** बालाजी टेलिफिल्म्स व मुंबई महानगरपालिका यांच्यातील न्यायालयीन वाद, बालाजी टेलिफिल्म्स, किलिक निक्सन कंपनीची अनधिकृत बांधकामे इत्यादीबाबतची माहिती जन माहिती अधिकारी (इ. व का.) श्री. प्र.कृ.कांबळे यानी विहित मुदतीत दिली नाही. आयोगाकडे अपील केल्यानंतर प्रथम अपिलाचे आदेश व काही माहिती मिळाली.

**जन माहिती अधिकारी :** माहिती देण्यासाठी म्हणून दुय्यम अभियंता श्री. पी.पी. भगत व कनिष्ठ अभियंता श्री. एन.एस.कांबळे यांची सहाय्यक माहिती अधिकारी म्हणून मदत घेतलेली आहे व त्यानी श्री. मनोजकुमार यादव याना देण्यासाठी माहिती सादर केलेली नाही. त्याबाबत श्री. पी.पी. भगत व कनिष्ठ अभियंता श्री. एन. एम. कांबळे याना ज्ञापन देण्यात आलेला आहे. व त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपिलकर्ता श्री. मनोज कुमार यादव याना विहित मुदतीत उत्तर देण्यात आलेले नाही. जन माहिती अधिकारी (इ. व का.) श्री. प्र.कृ.कांबळे यानी माहिती देण्यासाठी ज्यांची मदत घेतली, ते अधिनियमाच्या कलम ५ (४,५) अन्वये जन माहिती अधिकारी ठरतात. त्याना त्यांच्यावर नेमकी कोणती कारवाई करण्यात आली आहे व माहिती देण्यास विलंब झाल्याबद्दल शास्ती का करु नये, याबाबतच्या म्हणण्यासह त्यांचा खुलासा घेऊन जन माहिती अधिकारी (इ. व का.) श्री. प्र.कृ.कांबळे यानी ८ दिवसांत आयोगाला अहवाल सादर करावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणी दरम्यान दिले. परंतु अद्याप असा अहवाल प्राप्त झालेला नाही. ही बाब गंभीर आहे. असा अहवाल त्वरित सादर न केल्यास ते शास्तीस पात्र ठरतील.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.
२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार दिलेल्या मुदतीत अहवाल सादर न करण्याबाबतच्या खुलाश्यासह अहवाल जन माहिती अधिकारी (इ. व का.)

श्री. प्र.कृ.कांबळे यानी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर ८ दिवसांत आयोगाला सादर करावा.

**मुंबई.** **(विजय कुवळेकर)**
**दिनांक:०५/१०/२०११** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री.सुरेश रामचंद्र जाधव,
वृत्त शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
तळमजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

अपीलकर्ता

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक (माहिती/प्रशासन),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, रु नं. ८, तळमजला,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (माहिती/प्रशासन),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, रु नं. ८, तळमजला,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८४७/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०५.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश रामचंद्र जाधव - उपस्थित.

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक (माहिती/प्रशासन),
श्री. प्रल्हाद जाधव- उपस्थित

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (माहिती/प्रशासन),
श्री. प्र.का. महाले.

| | |
|---|---|
| | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

**अपीलकर्ताः** महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने सेवाजेष्ठतेप्रमाणे पदोन्नती व मानीव दिनांक मिळण्याबाबत व त्या अनुषंगाने पदोन्नत कर्मचाऱ्यासंबंधातील कागदपत्रांची मागणी केली होती. परंतु मिळालेल्या माहितीने समाधान झाले नाही.

**जन माहिती अधिकारी :** अपीलकर्ता श्री.सुरेश रामचंद्र जाधव यानी सन १९८५ पासूनची माहिती दिनांक १३.०७.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. विस्तृत स्वरुपाची माहिती असल्यामुळे अभिलेख अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती घेण्यासाठी येण्याबाबत दिनांक ०४.०८.२०१० च्या पत्रान्वये कळविले होते. परंतु तसे न करता त्यानी अपील केले.

**प्रथम अपिलीय अधिकारी** : आमच्याच विभागात अपीलकर्ता श्री.सुरेश रामचंद्र जाधव हे शिपाई म्हणून नोकरीला लागले. लिपिक संवर्गात पदोन्नती मिळण्याबाबतचा त्यांचा विषय आहे. नऊ वर्षातील सर्व कर्मचाऱ्यांच्या भरती / पदोन्नतीबाबतच्या आदेशाच्या प्रती इत्यादी माहिती संकलित करुन देणे शक्य आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीतही त्याना तसे स्पष्ट करुन कागदपत्रांचे अवलोकन करण्याबाबत सांगितले होते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्ता श्री.सुरेश रामचंद्र जाधव यानी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (९) अन्वये ती नकाराता येऊ शकते. परंतु नसे न करता अभिलेख अवलोकनाचा पर्याय जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (माहिती प्रशासन) श्री.प्र.का.महाले व प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक (माहिती प्रशासन) श्री. प्रल्हाद जाधव यानी अपीलकर्ता श्री.सुरेश रामचंद्र जाधव याना उपलब्ध करुन दिला असून तो रास्त आहे. अभिलेखांचे अवलोकन अपीलकर्ता यानी प्रतिनिधीमार्फत न करता स्वतःच करणे व हव्या असलेल्या कागदपत्रांची नेमक्या

स्वरुपात लेखी यादी जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (माहिती प्रशासन) श्री.प्र.का.महाले याना सादर करणे आवश्यक आहे. अपिलकर्ता श्री. सुरेश रामचंद्र जाधव यानी अशी यादी सादर केल्यास जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (माहिती प्रशासन) श्री.प्र.का.महाले यानी योग्य ते शुल्क आकारुन कागदपत्रांच्या प्रती पुरवरव्यात असे मौखित आदेश आयोगाने सुनावणी दरम्यान दिले.

**आदेश**

१. अपील अमान्य.

**मुंबई.**
**दिनांक:०५/१०/२०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री.ख्रिस बी. अमन्ना व नितीन टी. गवाणकर, अपीलकर्ता
अपना घर को.हौ.सो. बिल्डिंग नं.२/बी विंग,
रुम नं.५११, राजर्षी शाहू मार्ग, तेली गल्ली,
अंधेरी (पू.), मुंबई ४०००६९.

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उप जिल्हाधिकारी (अति-निष्का) अंधेरी,
गृहनिर्माण भवन, तळमजला, खोली क्र. ६५,६६,
बांद्रा (पू.), मुंबई ४०००५१. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसिलदार (अति-निष्का) अंधेरी,
गृहनिर्माण भवन, तळमजला, खोली क्र. ६५,६६,
बांद्रा (पू.), मुंबई ४०००५१.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९४४/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०५.१०.२०११ |
| **३ उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.ख्रिस बी. अमन्ना व नितीन टी. गवाणकर - उपस्थित<br><br>**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उप जिल्हाधिकारी (अति-निष्का) अंधेरी,<br>श्री. अे.व्हि.भोईर- उपस्थित.<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तहसिलदार (अति-निष्का) अंधेरी,<br>श्री. सी.डी. श्रीकर- उपस्थित | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

**<u>अपीलकर्ताः</u>** अपना घर सहकारी गृहनिर्माण संस्था, गुंदवली, अंधेरी (पूर्व) या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पातील झोपडी धारकांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या प्रमाणित प्रती खाजगी जमिनदारक व विकसक यांच्या संदर्भातील सन १९९५ मधील कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. परंतु संबंधित संचिका उपलब्ध होत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अति-निष्का) श्री.सी.डी. श्रीकर यानी कळविले. सात दिवसांत माहिती उपलब्ध करुन निःशुल्क देण्याचे आदेश प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्री. अे.व्हि.भोईर यानी देऊनही जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अति-निष्का) श्री.सी.डी. श्रीकर यानी माहिती दिली नाही.

**<u>जन माहिती अधिकारी :</u>** दि. २६.०७.२००५ रोजी झालेल्या अतिवृष्टित कार्यालयात पाणी शिरल्यामुळे बरीच कागदपत्रे वाहून गेली व कागदपत्रे खराब झाली. अपीलकर्ता श्री.ख्रिस बी. अमन्ना व नितीन टी. गवाणकर याना तसे कळविले. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विभागाकडे असलेल्या छायांकित प्रतीवरुन छायांकित प्रती अपीलकर्ता श्री.ख्रिस बी. अमन्ना व नितीन टी. गवाणकर याना पुरविल्या.

सन २००५ मध्ये महत्त्वाची मूळ कागदपत्रे नष्ट झाली असल्यास त्याबाबतच्या पंचनाम्याची / तक्राररीची नोंद असणे आवश्यक आहे. तशी ती नसल्यास मूळ कागदपत्रांचा शोध जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अति-निष्का) श्री.सी.डी. श्रीकर यानी एक महिन्यात घ्यावा व त्याबाबतचा अहवाल दिनांक ०५.११.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. ही गंभीर बाब आहे.

आदेश

१. अपील अशंतः मान्य.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार दिलेल्या मुदतीत अहवाल सादर न करण्याबाबतच्या खुलाश्यासह अहवाल जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अति-निष्का) श्री.सी.डी. श्रीकर यानी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर ८ दिवसांत आयोगाला सादर करावा.

**मुंबई.**
**दिनांक:०५/१०/२०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. कमल देव आहुजा, अपीलकर्ता
४३८, कावेरी, गावदेवी मंदीर,
ओशिवारा पोलीस स्टेशन मागे,
ओशिवारा, अंधेरी (प.), मुंबई ४००१०२.

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-९),
हिल रोड, बांद्रा (प.), मुंबई ४०००५०.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड, बांद्रा (पू.), मुंबई ४०००५०.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९४५/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०५.१०.२०११ |
| **३** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. कमल देव आहुजा - अनुपस्थित<br><br>**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-९), अनुपस्थित<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,<br>विद्यमान- श्री. अरुण शिंदे- उपस्थित<br>तत्कालीन - श्रीमती वनमाला पवार | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गृहनिर्माण संस्थेचे सचिव व काही सभासद यांच्या विरुध्द केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाहीबाबतची माहिती अपिलकर्ता यानी मागितली होती. संबंधित विषय ओशिवरा पोलीस ठाण्याच्याकक्षेत असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती घेऊन अपीलकर्ता श्री. कमल देव आहुजा याना पुरविली तसेच त्यांच्या तक्रारीनुसार अदखलपात्र गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. ही सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे. असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकार तथा सहाय्यक पोलिस आयुक्त श्री. अरुण गोविंद शिंदे यानी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारता घेता अपीलकता श्री. कमल देव आहुजा याना माहिती देण्यात आली आहे. आपल्या तक्रारीनुसार योग्य कारवाई न केल्याची अपीलकर्ता श्री. कमल देव आहुजा यांची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची बाब नाही.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येते.

**मुंबई.**
**दिनांक:०५/१०/२०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. शेखर चंद्रा साहू, अपीलकर्ता
फ्लॅट नं. ८२, जीवन आकाश, फोर्जेट हिल रोड,
दिनानाथ मंगेशकर मार्ग, ताडदेव, मुंबई ४०००३६.

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),
वाहतूक पोलीस मुख्यालय, ८७, सर पोचखानवाला रोड,
वरळी, मुंबई ४०००३०. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (नियोजन),
वाहतूक पोलीस मुख्यालय, ८७, सर पोचखानवाला रोड,
वरळी, मुंबई ४०००३०.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९५५/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ०५.१०.२०११ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शेखर चंद्रा साहू - उपस्थित

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),
श्री. नामदेव डी. चव्हाण- उपस्थित

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (नियोजन),
श्री. पंडीत दशरथ काळे - उपस्थित

| | |
|---|---|
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

**अपीलकर्ताः** वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतच्या नियमावलीची माहिती मागितली होती. परंतु, अधिकाऱ्याबाबतची माहिती न देता वाहतूक पोलिस अंमलदारांची कर्तव्ये व जबाबदारी याची प्रत पुरविण्यात आली. वाहन जप्त करण्याच्या संदर्भातील नियमावलीची ही योग्य माहिती मिळाली नाही.

**जन माहिती अधिकारी :** अपीलकर्ता श्री. शेखर चंद्रा साहू यानी सह-पोलिस आयुक्त यांच्याकडे अर्ज केला होता व त्याला मुद्रंक शुल्क जोडलेले नव्हते त्यामुळे २००५ अर्ज म्हणून त्याची दखल घेऊन संबंधितांकडे तो पाठवून माहिती देण्यास विलंब झाला. मुद्देनिहाय माहिती त्याना देण्यात आली असून वाहन जप्त करण्याच्या संदर्भातील नियमावलीची प्रतही दिली आहे.

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** : मुंबई पोलिस कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक पोलिस अंमलदार हा पोलिस अधिकारी मानला जातो. त्यामुळे अपीलकर्ता श्री. शेखर चंद्रा साहू याना दिलेली माहिती योग्य आहे. अपिलकर्ता श्री. शेखर चंद्रा साहू यानी नियमावलीची मागणी केली असून त्या सर्व नियमांची प्रतही दिलेली आहे.

सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेली नियमावलीसारखी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याच कक्षेतील मानता येणार नाही. त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. मात्र ही माहिती पुस्तकरुपात अथवा संकेतस्थळावर अथवा अन्य प्रकारे कोठे उपलब्ध होईल हे जन माहिती अधिकारी यानी कळविणे आवश्यक व पुरेसे आहे. नियमावलीच्या अनुषंगाने स्पष्टिकरणाची अपीलकर्ता श्री. शेखर चंद्रा साहू याची मागणी अधिनियमातील माहितीच्या व्याख्येत येत नाही.

**मुंबई.**
**दिनांकः०५/१०/२०११**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**